ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL. 4 NO. 6 SPECIAL ISSUE DECEMBER 2018 IMPACT FACTOR:4.197(IIJIF)



*Special Issue On*

## PROBLEMS AND CHALLENGES BEFORE THE WORKING WOMEN

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*

**Dr. Sunita Tengse**

*Assistant Editor*

**Dr. M. B. Patil**

IMPACT FACTOR:4.197(IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE

## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 4 NO. 6 SPECIAL ISSUE DECEMBER 2018

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On

## PROBLEMS AND CHALLENGES BEFORE THE WORKING WOMEN

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*

**Dr. Sunita Tengse**

*Assistant Editor*

**Dr. M. B. Patil**

Late Ramesh Warpudkar Colleege Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com

# CONTENTS


1. नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक दर्जा -नागपूर शहरातील महिलांचा चिकित्सक अभ्यास | **डॉ. सीमा अतुल पांडे** 7

2. मी टु चळवळ आणि कामकाजी महिला | **डॉ. अंजली जोशी -टेंभुर्णीकर** 12

3. महिला सबलीकरण आणि समाज दृष्टिकोन | **अनिता एस. गायकवाड** 20

4. ग्रामीण व शहरी कामकाजी महिलांच्या समस्या व त्यावरील उपाय आणी महिला आयोगाची भूमिका | **डॉ. जयश्री देशमुख** 23

5. भारतातील महिलांच्या समस्या आणि कायदे | **बळीराम पवार** 28

6. कौटुंबिक हिंसाचार अधिनियम- २००५ आणि स्त्रियांच्या सामाजिक समस्या | **ईश्वर लक्ष्मण राठोड** 32

7. भारतीय दंड सहिंतेतील महिला विषयक कायदे | **डॉ. प्रतिभा रं. बिरादार** 38

8. नोकरदार महिलांच्या कौटुंबिक समस्या | **डॉ. मारोती भोसले** 42

9. घरेलु कामगार महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास | **मनेष गंगाराम खटावे, डॉ. ए. टी. तवार** 46

10. स्त्रीवाद : वस्तुस्थिती आणि विपर्यास | **डॉ.सा.द.सोनसळे** 54

11. स्त्री स्वातंत्र आणि समाज | **डॉ. बालासाहेब मुंजाभाऊ काळे** 59

12. घरकाम करणाऱ्या मोलकरीन महिलांच्या समस्या व त्यावर उपाययोजना | **डॉ. बी.ए. साबळे** 63

13. महीला सबलीकरण व मानवी हक्क | **फाजगे ए. के.** 67

14. महिलांचे कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण | **जाधव सुलोचना** 71

15. कामकाजी महिला सुरक्षेत महिला आयोगाची भुमिका | **सुचित्रा शेषराव लढे** 75

16. 'मी टु'एक ऑनलाइन चळवळ | **डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे** 80

17. कामकाजी महिलांच्या कार्यालयीन व कौटुंबीक समस्या | **स्वाती विकासराव कुरमे** 85

18. महिला हिंसाचाराच्या समस्या | **नागनाथ निवृत्ती तेलंगे** 90

Late.Ramesh Warpudkar College

16

# 'मी टु'एक ऑनलाइन चळवळ

**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
ता. सोनपेठ जि.परभणी मो.८९८३७७६०७७

**प्रस्तावना :**

गेले काही दिवस आपल्या समाजाच्या डोक्यात झणझणीत अंजन घालणारी ठरली आहेत. अनेकक्षेत्रात काम कारणाऱ्या महिलांनी त्यांच्यावरील लैंगिक आत्याचार करणाऱ्यांची दुष्कृत्य मोठ्या धिटाईने उजेडात मानली आहेत, पत्रकारीता, मनोरंजना व चित्रपट उद्योग, राजकारण आणि कॉर्पोरेट विश्वत काम करणाऱ्या किंवा करत असलेल्या इतरही अनेक महिलांनी कोषातुन बाहेर पडुन आपल्या मनात खदखदणाऱ्या अशाच भावनांना मोकळी वाट करुन दिली. हॉलीवुडचे आघाडीचे दिगदर्शक हाली विस्निटल यांच्या पासुन या मोहिमेची सुरुवात झाली. तेव्हा अमेरिकेत पहिल्या दिवसापासुन ती माध्यमांमध्ये पहिल्या पानावरील बातमीठरली हे हजारो मैलावर घडत होते तरी त्या 'मी टु' मोहिमेचे धक्के भारतात ही जाणवत होते. अनेक स्त्रिया त्यांच्या आत्याचाराचे बेगडी मुखवटे फाडण्यासाठी पुढे येत आहेत त्यामुळे भारतात ही मोहीम एक नवा इतीहास घडवीणारा दिसत आहे.

विविध क्षेत्रातील महिलांनी त्यांच्या गत आयुष्यात घडलेल्या लैंगिक आत्याचाराच्या, पुरुषांच्या वासनासक्त लंपट वर्तमानाच्या आणि प्रसंगी बलात्काराच्या घटनांना वाचा फोडण्याची ही मोहिम,स्त्रीजनलज्जेस्तव, चारित्र अन शिलावर शिंतोडे उडण्याच्या भितीने पुर्वी अशा गोष्टींचा स्वतःहुन बभ्रा करत नसे,यात पुरुषप्रधान व्यवस्थेने तिच्या मानसीकतेची जी जडनघडन केली त्याचा भाग अधिक होता. म्हणुन स्त्रिया व्यक्त होत नसत. परंतु आता आपल्यावरील अन्यास विरुध्द त्या दाद मागत आहेत.

**शोधनिंबधाचा उद्येश :**

* भारतीय महिलांची स्थिती अभ्यासणे
* मीटू मोहीमे चा उद्येश जाणुन घेणे
* भारतीय महिलांचा व मीटू मोहीमेतील सहभाग अभ्यासणे
* महिलांच्या सुरक्षे संदर्भातील कायदे जाणुन घेणे
* मीटु मोहीमेचा परिणामांचा अभ्यास करणे



**संशोधन पध्दती :** शोधनिबंध लेखनासाठी संदर्भगृथे,
दुय्यम तथ्यअंकलन साधने प्रस्तुत
वृतपत्रे व इंटरनेटचा वापर करुन विचारांची मांडणी केली आहे.

**गृहितक :** २१ व्या शतकात महिला विविध क्षेत्रात यशस्वी होत असतांना त्यांच्या
सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत आहे.

२००६ पासुन सुरु झालेल्या मी टु चळवळीला २०१७च्श्या अखेरीस खऱ्या
अर्थाने चालना मीळाली मी टू हा हॅशटॅग ठेवणार ट्वीट रिट्वीट करणार यांच्या संखेने
पाच लाखचा टप्पा अल्पावधीच ओलांडुन आणी अमेरीकेत त्याबाबत राजकीय
हालचाली करावी लागली हळुहळु या मोहीमेत पडसाद चीन,जपान,फ्रान्स,
इथीयोपिया,अफगाणीस्थान, पाकीस्थान आणी अर्थात भारतात उमटले .स्त्रियांचा
पुरुषाकडुन होणारा लींगछळ तो मग बलात्कार, विनयभंग,अश्लिल टिपण्णी
,छेडछाड आसुदे .या छळाचे आनुभव व्यक्त करायचे नाहीत हे संस्कार मुलींवर
बालपनापासुन वयात येण्या अधीपासुनच घरात केले जातात. जर तिने तिच्यावरील
आन्याविरोध्द तोंड उघडलेतर . अविश्वास दाखवला जाण्यापासून चिखल फेकी
पर्यंत सगळे तीला एकटीला सहन करावे लागते. समानहाक्क्ासाठी लढणरयांची
एकत्र येणे हे नैसर्गीक आहे. व आवश्याकही आहे आज कोटयावधी स्त्रिया पुरूषी
आत्याच्याराला बळी पडत आसताना त्या विरोध्द उठवणाऱ्या विरोध्द बोटावर
मोजण्यादतक्याच का आसतील ? त्या संघटीत का होत नाहीत. बलात्कार च्या
घटनांविरोध्द स्त्रिया मोर्चे काढतात निषेध करतात . पण लैंगिकछळाविरोध्द विशेषतः
कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळाविरोध्द लढणारी बाई एकटीच का आसते ? या
प्रश्नाची उत्तरे देण्याचा प्रयत्न करणारी एक ऑनलाईन चळवळ गेल्या महिन्यात
जोर धरुन आहे. 'मी टु' किंवा 'Me Too' सामाजिक कार्यकर्त्या **टमारा बर्क** यांनी
२००६ मध्ये ही संज्ञा प्रथम वापरली, लैगीक छळाला बळी पडलेल्या स्त्रियांना
सहानभूतीच्या पलीकडे जावुन सहानुभूतीचा आधार देण्यासाठी त्यांनी ' मी टु' ही
संकल्पना आनली १५ ऑक्टोबर २०१७ रोजी अमेरिकन अभिनेत्री **अलिसा
निलानोने** या संकल्पनेचा वापर करुन ट्विटरमार्फत अवाहन केले की लैंगिक
छळाला बळी पडलेल्यांनी ' मी टु' हा हॅशॅटग मोहिमेला सोशल मिडीयावर प्रचंड
प्रतिसाद मिळाला. मनोरंजन, क्रिडा, राजकारण, वैद्यक, आर्थिक, उद्योग यापासुन ते
अगदी लष्कर आणि धार्मिक स्थळापर्यंत सर्व ठिकाणी लैंगिक छळाचा सामना करावा
लागला असे स्त्रियांनी सोशल मिडीयावरुन नमुद केले. आलिसाच्या अवाहानंतर 'मी
टु' हा हॅशॅटग ठेवण्याऱ्या तसेच जिचे ट्वीट टिट्वीट करणाऱ्यांच्या संख्येने पाच
लाखाचा टप्पा अल्पाधीच ओलांडला. 'मी टु' ही, चळवळ अमेरिकेतुन सुरु झाली
असली तरी खरे तर तिला भैगोलीक सिमा नाहीतच कारण ती सोशल मिडियामार्फत

चालवली जाणारी ऑनलाईन चळवळ आहे. या चळवळीने व्याप्त आत्मवधीय साऱ्या जगभरात पसरले. लैंगिकछळाची समस्या जगाच्या कानाकोपऱ्यात कमी सारख्याच तिव्रतेने अस्तित्वात आहे यांचे पुरावे देणाऱ्या पोस्टस जगभरातून पडु लागल्या ८५ देशांमध्ये हा हॅशॅटश ट्रेण्डिंग आहे. 'मी टु' या संज्ञेची भाषांतरे करून ही चळवळ पसरली.

भारतात ही 'मी टु' चळवळीला स्त्रियांनी उदंड प्रतिसाद दिला. यात सहभागी झालेल्या भारतीय स्त्रियांचे वैशिष्ट्य म्हणजे यात २१ व्या शतकात तारुण्यात पदार्पण केलेल्या मुली - स्त्रिया बहुसंख्येने आहेत. लैंगिक छळाचे प्रकार मोठे संख्येने घडतात त्या चित्रपटसृष्टीतील अभिनेत्रींनी आपले अनुभव सांगितले.अक्टोबर २०१७ मध्ये कॅलिफोर्नियातील भारतीय विद्यार्थीनी **राया सरकार** आणि कार्यकर्त्या **इंजी पेन्चु** यांनी लैंगिक छळ करणाऱ्या प्राध्यापकांची यादी सोशल मिडीयावर प्रसिध्द केले. 'मी टु' ही संज्ञा प्रथम वापरली गेली ती स्त्रियांच्या संदर्भातच मात्र या चळवळी उत्तम प्रतिसाद मिळाल्यामुळे बाल हक्कासाठी काम करणायांनी ही या व्यासपीठाचा उपयोग जागृतीसाठी सुरु केला.

**मीटू चळवळीचा उद्येश :**

**मुळात अलिसा निलानोने हा हॅशटॅग ॲक्टिव्हिझम सुरु केला. तेव्हा त्यामागचा उद्येश हा समानुभूती (एम्पथी) च्या माध्यमातुन सक्षमीकरण हा होता.** कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ या समस्येची व्याप्ती आणि गांभीर्य लोकांना समजावे एवढाच उद्येश अलिसाचा होता. मुळात लैंगिक छळाचे मुळ समाजाच्या पुरुषप्रधान मानसीकतेत दडले आहे. स्त्री पुरुष समानता खऱ्या अर्थाने समाजात रुजेल तेव्हा कोणत्याही व्यक्तीकडुन विरुध्दलिंगी व्यक्तीचा असा त्रास होत असले अशा वेळी हे का घडले आणि ते कसे थांबवता येईल याचा विचारही झाला पाहिजे. अगदी बालपणापासुन आपल्याकडे रुजवले जाणारे साचे मोडुन एका लींगनिरपेक्ष समाजाच्या दिशेने जाण्याचे प्रयत्न आपण केले पाहिजेत. या प्रयत्नांत कोणीही एकटे पडणार नाही याची काळजी घेण्यासाठी 'मी टु' सारख्या चळवळी मदत करत आहेत.

'मी टु' चळवळ ही सोशल मिडीयाव्दारे चालवली जाणारी चळवळ असल्यामुळे केवळ इंटरनेट ॲक्सेस असलेल्यापुरतीच ती मर्यादीत आहे. त्यामुळे यातुन जे काही दिसत आहे ते केवळ हिमनगाचे एक टोक आहे असे अनेकांनी म्हटले आहे. मात्र मुख्य धारेतील स्त्रीवादी चळवळीने हुंडाबळी, स्त्री शिक्षण, बलात्कार यासारख्या अधिक गंभीर वाटणाचा समस्यांवर लक्ष केंद्रीत केले असल्यामुळे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळावर तोडगा काढण्यासाठी ही मोहिम उपयुक्त आहे अशी भूमीका मांडली गेली.

**'मीटू ' मोहिमेचे परिणाम :**



इतर कोणत्याही बाबतीत होते तसे या मोहीम ही सुपातले निष्कारण जात्यात भरडले जाण्याची शक्यता आहे. ज्यांना कोणाचा तरी वचपा काढायचा आहे असे लोकही या ' मी टु ' च्या लाटेवर स्वार होऊन एखाद्या निष्कलंक व्यक्तीला विनाकारण बदनाम करण्याची भिती आहे त्यामुळे ही 'मी टु' चळवळ आशा स्वार्थी लोकांच्या हातचे कोलीत बनणार नाही याची जबाबदारी समाजातील जबाबदार व्यक्ती या नात्याने आपल्या प्रत्येकाची आहे. तसे झालेतरच ज्याच्यावर अन्याय झाला आहे. अशांच्या कथना वरही कोणी विश्वास ठेवणार नाही व त्यामुळे या मोहीमे चे फलीत होणार नाही. आपल्या पुरुषप्रधान समाजरचने मुळे पुरुष व स्त्रीविषयी जाहीर विचार मंथन आपण नेहमी 'तो' विरुध्द 'ती' असा विचार करत आलो आहोत. काळ बदलत चालला आहे त्यामुळे आपण आपल्या चर्चेचे स्वरुपही त्यानुसार बदलायला हवे. लिंगभेद न करता अशा होणाऱ्या चर्चेत दुष्कर्मावर भर देणे गरजेचे आहे. पुरुषही अशा आत्याचाराला बळी ठरु शकतात व जेव्हा असे घडते तेव्हा त्यांचे म्हणने ही तेवढ्याच आत्मीयतेने ऐकले जायला हवे. कामाच्या ठिकाणी, घरी, सार्वजनीक ठिकाणी असो सर्वच ठिकाणी मानवी सन्मानाचा आदर ठेवुन न्यायाचे वागणे गरजेचे आहे. स्त्रियांसाठी समाजात निकोप वातावरण तयार व्हायला हवे असेल तर आणखी दोन - तीन पावले पुढे टाकण्याची गरज आहे यातील पहिले पाऊल म्हणजे ज्या ज्या पुरुषांवर असे आरोप झाले आहेत त्यांने ते कबुल करणे. दुसरे पाऊल म्हणजे अशा कबुलीनंतर संबधीत स्त्रियांनी त्यात्या पुरुषांना मोठ्या मनाने जाहीरपणे माफ करणे. तिसरे पाऊल म्हणजे घरा घरातील पत्नी, आई, बहीन, अशा स्त्रियांनी कुटूंबातील पुरुषांशी या विषयी मोकळेपणाने बोलुन त्यांच्याकडुन पुर्वायुष्यात असे काही घडले असेल तर त्या स्त्री ची माफी मागण्यास प्रवृत्त करणे. असे झाले तर कालांतराने ' मी टु' ची गरजच उरणार नाही.

**सारांश :**

भारतीय महिलांनी पुरुषी मानसीकतेच्या व्यथा मांडल्या परंतु आपल्याकडे तक्रारदार आणि आरोपी त्याच्यापैकी विश्वसार्ह कोण या वरच चर्चा घुटमळावी हे अंचबित करणारे आहे. प्रत्येक महिलेस तीची तक्रार मांडवयाला व्यासपीठ मिळावयालाच हवे. जिच्या बाबतीत लैंगिक आत्याचार घडतात तीला त्याविषयी जाहीरपणे वाच्यता करतांना मोठे धैर्य दाखवावे लागते. त्या घटनेने विदीर्ण झालेली त्यांची मने सावरायला काही काळ लागतो. अशा वेळी पीडीतेची व कुटूंबीयांची मोठी घालमेल होत व त्या धक्कातुन बाहेर यालाच काही काळ जावा लागतो.'मी टु' मोहिमेतुन त्यांच्यावर आत्याचार करणारांचा संताप, चीड आणि उद्देग उघडपणे मांडण्याऱ्या या स्त्रियांना समाजाच्या पाठीब्यांची गरज आहे. यातुनच या मोहिमेला बळ मिळण्याची आशा आहे. माध्यमे आणि समाजाने हा विषय अत्यंत संवेदनशीतलेने हाताळायला हवा व कोणतेही विधान करण्यापुर्वी या मानसीक

Late.R... Parbhani (M.S.) ... Warp...

क्लेषातुन गेलेल्या पीडीता व त्यांच्या कुटूंबीयांच्या नाजुक मनोदशेचा विचार करायला हवा. पिडीतेस न्याय देण्यास आपणसारे बांधील आहेत. या 'मीटू' मोहिमेमुळे समाजातील अनेक समीकरणे बदलुन त्यातुन महिलांशी सद्वर्तन हे जेथे समाजाच्या अंगवळणी पडले आहे असा नवा भारत उदयाला येईल व त्यासाठी मुद्दाम काही प्रयत्न करण्याची गरजही राहणार नाही.

**संदर्भसुची :-**


१) https ://m economic times.com, १६ oct २०१८
२) https : // www.loksatta.com,३march २०१८
३) https : // www esakal.com, १५ oct २०१८
४) दै. लोकमत, 'मंथन', सुनिल तांबे यांचा लेख, १८ ऑक्टोबर २०१८
५) दै. पुण्यानगरी, १४ आक्टोबर २०१८ पान नं. ६
६) दै. लोकमत, १४ आक्टोबर २०१८, पान नं. ८
७) दै. लोकमत १४ आक्टोबर २०१८, ऋषीदर्डा यांचा लेख, १४ आक्टोबर २०१८
८) दै. भास्कर १० आक्टोबर २०१८


❑❑❑


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani




17

# कामकाजी महिलांच्या कार्यालयीन व कौटुंबीक समस्या


**स्वाती विकासराव कुरमे**
अर्थशास्त्र विभाग, सरस्वती विद्यामंदिर किनवट
मो.नं. ९४०३९१८६४९


'यत्र नार्थसतू पुज्यते, रमन्ने तत्र देवत:' म्हणजे जिथे स्त्रिचा मान संम्मान केला जातो तीथे देवतांचे वास्तव्य आहे. अशा प्रकारची मुल्य व्यवस्था असलेली भारतीय संस्कृतीची ओळख आहे. पण सध्याच्या स्थितीत तो कुतुहलाचा विषय बनला आहे.

आज २१ व्या शतकात महिलांनी बरीच मजल मारली आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला पायरोवुन वटवृक्षा सारखी उभी आहे आणि हे कौतुकास्पद आहे. आज स्त्री खुप पुढे निघुन गेली आहे आज तीने प्रत्येक क्षेत्र आपल्या पायाखाली तुडवीली आहेत. पुर्वी चुल आणि मुल तेवढेच करणारी स्त्री आज त्या जबाबदाऱ्या सांभाळून देखील आर्थीक क्षेत्रात खंबीर उभी आहे. पण खरच ती स्वतंत्र आहे? असा प्रश्न पडतो. आज पुरुषाच्या विषारी नजरा बालीकेपासुन वृध्येवरही अत्याचार करतांना दिसतात.

गर्दीत, समाजात, शाळेत, नातेवाईकात आज एकतरी स्त्री सुरक्षीत आहे का? नौकरीच्या ठीकाणी लोकल मध्ये, अपरात्री प्रवास करणारी स्त्री सुरक्षीत आहे? ............ तर याचे उत्तर नाही असेच आहे. ऐवढे असुन सुध्दा महिला स्वताच्या अस्तीत्वाची जानीव करुन देण्यासाठी आज प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावुन काम करत आहे. तेव्हा तीला सुरक्षीततेची जानीव करुन देऊन तीला समाजाने, कुटुंबानी मदतीचा हात देऊन तीचा आत्मविश्वास वाढवीला पाहीजे.

**अध्ययनाची उदिष्टे :** या चिंतन विषय अभ्यासाची प्रमुख उद्दीष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१) कामकाजी महिलांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
२) कामकाजी महिलांच्या समस्यांवर संभाव्य उपाय योजना सुचविने.

**संशोधन पध्दती :** सदर शोध पत्रीका लिहीत असतांना दुय्यम स्वरुपाच्या माहितीचा आधार घेण्यात आला आहे. तो आधार उद्दीष्टे समोर ठेवुन सामुग्रीचे संकलन करण्यात आले आहे. विश्लेषनात्मक पध्दतीचा वापर करुन शोध विषय स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.